FORM-1 A | N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे ला.प्र.वि., पहिली खबर क्र. १८/२०१८, वर्ष २०१८, दिनांक २३/०५/१८
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारित २०१८), कलमे Sections ७,१३
(ii) अधिनियम Act ......, कलमे Sections ......
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......

3. (a) अपराधाची घटना : वार सोमवार, तारीख पासून ०६/०५/१८, वेळ ११.४१, तारीख पर्यंत ०८/०५/१८ वेळ १६.५५
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख १२/०४/२०१८, वेळ ......
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. २६/२०१८, तारीख २३/०५/१८, वेळ १७.००
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ......, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ......, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. ......
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव मुंबई झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण, के पुर्व विभाग, प्रशासकिय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पुर्व) मुंबई - ५१, ठिकाणाचे नंबर ......, गल्ली ......, रस्त्याचे नाव ......
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ......, गाव ......, पोस्ट ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name श्री मनोज दोनोडे (b) वडीलाचे / पतीचे नाव श्री शेषराव दोनोडे
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ५० वर्षे (d) राष्टीयत्व भारतीय फोन नं. ......
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ...... दिल्याचा दिनांक ...... दिल्याचे ठिकाण ...... (f) व्यवसाय आर्किटेक्ट
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ......, जनजात Sub-Caste ......
(h) पत्ता : ...... गल्ली / सर्वे नं. ...... घर / नाव नंबर ...... फोन /मो. नंबर ...... पॅन नं. ...... वोटर्स नं. ......
Address Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
सह्याद्री, ओ-३०३ सेक्टर ०७, वसंत नगरी, वसई (पु) जि. पालघर
रस्त्याचे नाव ...... जवळचे प्रसिद्ध ठिकाण ...... गाव ...... पोस्ट ...... पो. स्टे. ......
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ...... जिल्हा ...... राज्य ...... सध्याचा पत्ता ......
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

१) श्री महिशी, कार्यकारी अभियंता २) श्री सुर्यवंशी दुय्यम अभियंता,
३) श्री दिघावकर उप अभियंता सर्व के पुर्व विभाग झोपडपट्टी पुर्नविकास,
प्राधिकरण, प्रशासकिय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पुर्व) मुंबई.
४) इसम श्री. पारकर

यातील नमुद फिर्यादी श्री. मनोज शेषराव दोनोडे वय ५० वर्षे, व्यवसाय - आर्किटेक्ट, रा. डी. शहनाई, ओ-३०३, सेक्टर ०१, वसंत नगरी, वसई (पु.) जि. पालघर - ४०१२०२ यांचा स्वतंत्र कागदावर संगणकाद्वारे टंकलिखीत केलेला जबाब हा गुन्ह्याची पहिली खबर म्हणुन संबोधण्यात आला आहे.

समक्ष

23/05/19

(रेवणसिद्ध टेंगळे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई.

फिर्याद दिनांक २३/०५/२०१९

श्री.मनोज शेषराव दोनोडे, वय ५० वर्षे, धंदा–व्यवसाय, व्यवसाय – आर्कीटेक्ट, आर्कीटेक्टरल सर्व्हिसेस, आर्कस्पेस प्लॉनिंग ॲन्ड डिझायनिंग, प्रायव्हेट लिमिटेड, २०१, कोठारी निवास सॅनिटोरीयम लेन, घाटकोपर (पश्चिम), मुंबई–४०० ०८६ रा.ठि. – शहनाई ए/३०३, सेक्टर ०१, वसंत नगरी, वसई (पुर्व) जि. पालघर ४०१२०२

–००–

मी समक्ष फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन वर दिलेल्या पत्यावर गेली २० वर्षापासून माझ्या कुटुंबासह राहतो. मी आर्कीटेक्ट असुन माझा आर्कीटेक्टरल सर्व्हिसेस, आर्कस्पेस प्लॉनिंग ॲन्ड डिझायनिंग, प्रायव्हेट लिमिटेड या नावाने खाजगी व्यवसाय आहे. सदर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमध्ये आर्कीटेक्टरल सर्व्हिसेसची कामे घेतो. सदर कामामध्ये म्हाडा, एस. आर.ए., बृहन्मुंबई महानगर पालिका, एम.एम.आर.डी.ए. इत्यादी शासकीय कार्यालयाशी आमचा वेगवेगळया बिल्डींग व सिव्हिल कामासाठी लागणाऱ्या परवानगीविषयी नेहमी संबंध येत असतो.

माहे जानेवारी २०१९ मध्ये आमच्या कंपनीला मेरीटाईम्स ट्रेनिंग ॲन्ड रिसर्च फाउंडेशन कंपनीकडुन त्यांच्या कनकिया वॉल स्ट्रीट, व्हिलेज चकाला येथील नविन ऑफिसच्या इंटीरीयर डिझाईन व रिन्युव्हेशनचे काम मिळाले होते. त्याकरीता दिनांक १३.०४.२०१९ रोजी कार्यकारी अभियंता, के पुर्व विभाग, झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण, प्रशासकिय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा पुर्व, मुंबई येथे माझे कंपनीकडुन नमुद काम करण्याबाबत परवानगी मिळणेकरीता रितसर अर्ज केला होता. सदरची परवानगी ही उप अभियंता, सहायक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी तपासणी केल्यानंतर सेवा, अटी, नियमाची पुर्तता झाल्यास त्यावर त्यांच्या स्वाक्षऱ्या होतात. त्यांच्या स्वाक्षरीनंतर अंतिम मंजुरी कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षरीने मिळते. यासंबंधाने माझा वरील अधिकाऱ्यांशी संपर्क आला आहे.

मी वरील प्रमाणे रितसर अर्ज करुन देखील मला नियमाप्रमाणे ठरवुन दिलेल्या कालावधीत परवानगी पत्र मिळाले नसल्याने मी एस.आर.ए. कार्यालयास वारंवार जात होतो व माझ्या कामाच्या परवानगीशी संबधीत लोकसेवक १) श्री महिशी, कार्यकारी अभियंता, २) श्री सुर्यवंशी, दुय्यम अभियंता, ३) श्री दिघावकर, उप अभियंता तसेच लोकसेवक श्री महिशी, कार्यकारी अभियंता, यांच्याकडे असलेला इसम पाटकर (पुर्ण नाव व पद माहित नाही) यांचेशी वारंवार विचारणा करीत होतो. दरम्यान लोकसेवक श्री महिशी, श्री सुर्यवंशी, दुय्यम अभियंता, श्री दिघावकर, उप अभियंता यांनी मला प्रत्येकी रु. २,००,०००/– वरील परवानगीसाठी लाचेची मागणी केली. माझी त्यांना माझ्या कायदेशीर कामासाठी लाच देण्याची इच्छा नव्हती म्हणुन मी दिनांक १२.०४.२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागास सदरबाबत ईमेलव्दारे तक्रार केली आहे.

मी ला.प्र.वि. मुंबई कार्यालयास केलेल्या ईमेलव्दारे दिलेल्या तक्रारीवरुन लाप्रविचे अधिकारी पो.नि. ठेंगले यानी माझेशी संपर्क साधुन लाप्रवि कार्यालयास बोलविले. म्हणुन मी दि. ०६.०५.२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग या कार्यालयात येवुन मी ईमेलव्दारे केलेल्या तक्रारीस अनुसरुन वर नमुद लोकसेवक व त्यांच्या कार्यालयात काम करणारा इसम पाटकर यांचेविरुध्द स्व:हस्ताक्षरात इंग्रजीतुन लेखी तक्रार अर्ज दिला.

समक्ष
(रेवणसिद्ध ठेंगले)
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि मुंबई

23/5/19

त्यानंतर पो.नि. ठेंगले पडताळणी पथक व दोन शासकिय पंच यांची ओळख करुन दिली. त्यानंतर पडताळणीच्या अनुषंगाने घ्यावयाच्या खबरदारीबाबत दोन शासकिय पंचासमक्ष योग्य त्या सुचना दिल्या.

त्याप्रमाणे पो.नि.ठेंगले, दोन शासकिय पंच व सापळा पथक सरकारी वाहनाने लोकसेवक यांना भेटण्यासाठी गेलो. बांद्रा कोर्ट येथे पोहचल्यानंतर शासकिय वाहन तेथेच थांबविले. तेथुन मी व पंच क्र. ०१ हे लोकसेवकास भेटण्यासाठी गेलो.

लोकसेवकांसोबत झालेल्या चर्चेदरम्यान लोकसेवक १) श्री महिशी, कार्यकारी अभियंता यांना मी प्रत्येकी दोन लाख रुपये जास्त होतात, असे सांगितल्यावर उलट त्यांना माझी किव वाटते असे म्हणुन इंजिनिअर, सब इंजिनिअर असणारच, तुम्ही काय नविन नाही, एक नाही आहोत आम्ही, तुम्ही एकदाच बिझनेस करणार आहात काय? तुम्ही असे वागताय, असे म्हटल्यावर मी त्यांना उदया घेवुन येतो असे बोललो. त्यावर श्री महिशी म्हणाले की, हे एवढयासाठी एक एक महिना लावता, असे म्हणुन त्यांनी पाटकर यास बोलाविले. परंतु पाटकर बाहेर गेले असल्याचे समजल्यावर ते पाटकर आल्यावर त्याच्याशी बोलतो. असे सांगुन मला लाचेच्या रकमे संबंधाने पाटकरांशी बोलुन घेण्यास सांगितले.

नंतर मी श्री सुर्यवंशी, दुय्यम अभियंता यांची त्यांच्या कक्षात माझ्या प्रलंबित कामासंदर्भात समक्ष भेट घेतली व चर्चेदरम्यान दोन लाख रुपये जास्त होतात '' असे म्हटल्यावर त्यांनी पाटकरला विचारा किंवा कोणाला विचारुन आयडीया घ्या, असे म्हणुन माझ्याकडे तडजोडीअंती प्रत्येकाचे '' दीड... दीड... दीड... दया '' असे म्हणुन एकुण रु. ४,५०,०००/– लाचेची मागणी केली व ती रक्कम दिनांक ०७.०५.२०१९ रोजी बारा साडेबारा वाजता घेवुन येण्यास सांगितले. त्याचवेळी उप अभियंता श्री.दिघावकर तेथे आले. त्यांना सुर्यवंशी साहेबांनी मी प्रत्येकी दीड दीड लाख देण्यास तयार असल्याचे सांगितले. तेव्हा त्यांनी ''हु'' असे म्हणुन माझ्याशी चर्चा करुन दुय्यम अभियंता सुर्यवंशी प्रमाणेच लाचेची रक्कम उदया सकाळी म्हणजेच दिनांक ०७.०५.२०१९ रोजी बारा साडेबारा वाजता घेवुन येण्यास सांगितले. तेथुन मी व पंच पो.नि.ठेंगले व सापळा पथक ज्याठिकाणी थांबले होते त्याठिकाणी परत आलो व त्यांना घडलेली हकिकत सांगुन लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तेथुन गोपनियच्या कारणास्तव ब्युरो कार्यालयात परत आलो व तेथे पो.नि. ठेंगले यांनी दिनांक ०७.०५.२०१९ रोजी सापळा पुर्व पडताळणीचे आयोजन करणार असल्याचे सांगितले.

लाचेची रक्कम मोठी असल्याने व त्याची जुळवा जुळव करण्याकरीता अधिक वेळ लागणार असल्याने मी दिनांक ०७.०५.२०१९ रोजी ला.प्र.वि. कार्यालयात उपस्थित राहु शकत नसल्याचे पो. नि.ठेंगले यांना सांगुन दि. ०८.०५.२०१९ रोजी उपस्थित राहणार असल्याचे सांगितले.

दि.०८.०५.२०१९ रोजी सांगितल्याप्रमाणे मी ब्युरो कार्यालयात हजर झालो मला पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, माझ्याकडे लाचेच्या रकमेची पुर्ण व्यवस्था झाली नाही रु. २०,०००/– इतक्याच रक्कमेची व्यवस्था झाली असल्याचे मी सांगितले आणि नजीकच्या काळात होईल याची शक्यता नसल्याने त्यांनी माझ्या जवळ असलेल्या रु. २०,०००/– रकमेतुन सापळयाचे आयोजन करावे, अशी मी विनंती केली. मी सापळा कारवाईकरीता आणलेली रक्कम

कमी असल्याने लाचेची रक्कम पुर्ण करण्यासाठी उर्वरीत रक्कम खेळण्यातील नोटांचा वापर करणार असल्याचे पो.नि.ठेंगले यांनी सांगितले.

त्यानंतर मी, दोन शासकिय पंच व सापळा पथक लोकसेवक यांच्या कार्यालयात लोकसेवक यांना भेटण्याकरीता लाचेच्या रकमेसह रवाना झालो.

लोकसेवक यांच्या कार्यालयापासुन थोडया अंतरावर वांद्रे कोर्टा बाहेरील जागेत शासकिय वाहन थांबवुन मी व पंच क्र. १ लोकसेवक यांच्या कार्यालयात लोकसेवक यांना भेटण्यासाठी पायी चालत निघालो. आमच्या मागे काही अंतरावरुन सापळा पथक आमच्या हालचालीवर लक्ष ठेवुन होते.

त्यानंतर मी पंचासह लोकसेवकाचे एस.आर.ए., वांद्रे कार्यालयात जावून भेट घेतली असता लोकसेवक महिशी यांनी " तुम्हाला योग्य वाटत ते करुन घ्या, मी इश्युची सही केलेली आहे, " असे सांगितले व मला ईश्युचे पत्र भेटल्यानंतर पुन्हा लोकसेवक महिशी यांना भेटण्यास गेलो. त्यावेळी मागणी केलेली रक्कम सुर्यवंशी यांचेकडे दया " असे सांगितले. त्यानंतर मी इसम पाटकर यांना भेटलो असता त्यांनी लाचेची रक्कम घेण्यासाठी एचडिएल टॉवर जवळ बाहेर थांबा असे सांगितले. त्याप्रमाणे मी सांगितलेल्या ठिकाणी थांबलो. परंतु बराच वेळ ते आले नाहीत, म्हणून मी त्यांना मोबाईल वर संपर्क केला असता, ते कामात असून संध्याकाळी महिशी साहेबांना फोन करुन तुम्हाला कॉल करतो, असे सांगितले. तद्नंतर संध्याकाळी मी पुन्हा पाटकर यास मोबाईलवर संपर्क केला असता त्यांनी तुमचा माणुस महेश यांचेकडुन बघु, तुम्ही आता जा, असे सांगितले. त्यानंतर आम्ही पंच व सापळा पथक ला.प्र.वि.कार्यालयात परत आलो.

तरी लोकसेवक १) श्री महिशी, कार्यकारी अभियंता, २) श्री सुर्यवंशी, दुय्यम अभियंता, ३) श्री दिघावकर, उप अभियंता यांनी माझेकडे माझे कायदेशीर सरकारी काम करुन देण्याकरीता दि. ०६/०५/२०१९ व दि.०८/०५/२०१९ रोजी प्रत्येकी रू २,००,०००/—प्रमाणे एकुण रू ६००,०००/— लाचेची मागणी करून तडजोडी अंती प्रत्येकी रू १,५०,०००/— प्रमाणे एकुण रू ४,५०,०००/— स्विकारण्याचे मान्य केले. तसेच सदरची लाचेची रक्कम स्विकारणे सुलभ जावे म्हणुन लोकसेवक श्री महिशी यांच्या कार्यालयात काम करणारा इसम पाटकर यांनी त्यास सहाय्य केले म्हणुन त्यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमन्वये कायदेशीर कारवाई होण्यास विनंती आहे.

समक्ष

( रेवणसिध्दे ठेंगले )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

23/5/19

8\. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ........ गोपनियता
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9\. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10\. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकुण मुल्य ........ रु. ४,५०,०००/-
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11\. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12\. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी यातील तक्रारदार श्री. मनोज दोनोडे यांना इंटिरीयर डिझाईन व रिन्युवेशनचे परवानगी देण्यासाठी यातील लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे कायदेशीर सरकारी काम करून देण्याकरीता प्रत्येकी रु. २,००,०००/- प्रमाणे एकुण रु. ६,००,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रुपये १,५०,०००/- प्रमाणे एकुण रु. ४,५०,०००/- स्विकारण्याचे मान्य केले तसेच सदर लाचेची रक्कम स्विकारणे सुलभ जावे म्हणून लोकसेवक यांच्या कार्यालयात काम करणारा इसम पारकर यांनी सहाय्य केले म्हणुन त्यांचेविरुद्ध ला.प्र.अधि. १९८८ (सुधारीत २०१८) कलम ७, १२ अन्वये गुन्हा नोंद.

13\. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

श्री. रेवणसिद्ध ठेंगले, पोलीस निरीक्षक

2\. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3\. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ................ Rank................ No. ............. to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........................................ (3) Transferred to P.S ........................................, District .......................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14\. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ... रेवणसिद्ध तुकाराम ठेंगले
पदनाम Rank ... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ... ला. प्र. वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ..........................

15\. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**